राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत MES (मोडयुलर एम्प्लॉएबल स्किल) योजनेच्या निधी वितरणासाठी प्रशासकीय मान्यता देण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र.कौविका-२०११/(१९/११)/व्यशि-५
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ फेब्रुवारी, २०१०.

पहा : १. शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२००८(२६४/०८)/व्यशि-२, दिनांक १३ ऑगस्ट २००८
२. शासन निर्णय क्रमांक कौविका-२०१०(१७७/१०)/व्यशि-५, दिनांक २९ डिसेंबर २०१०.
३. DGET, New Delhi यांचे पत्र क्रमांक DGET-7/2/2010-MES/IS, दिनांक २९/१२/२०१०

**प्रस्तावना-** मा.पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय स्तरावरील कौशल्य विकासासंदर्भातील धोरण निश्चित करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास परिषदेची (Prime Minister's National Council on Skill Development) स्थापना करण्यांत आली आहे. सदरहू कौशल्य विकास परिषदेने ५०० दशलक्ष कुशल मनुष्यबळाची निर्मिती सन २०२२ पर्यंत करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. याअनुषंगाने राज्यामध्ये MES (मोडयुलर एम्प्लॉएबल स्किल) योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संदर्भ क्रमांक १ नुसार शासन निर्णय निर्गमित करण्यांत आलेला आहे.

२. कौशल्य विकास कार्यक्रम (Skill Development Initiative Scheme) अंतर्गत मोडयुलर एम्प्लॉएबल स्किल (Modular Employable Skill) या योजनेसाठी Vocational Training Provider (VTP) आणि Assessing Body (AB) यांना केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे प्रतिपूर्तीचा निधी आतापर्यंत कामगार व रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून परस्पर Regional Director of Apprenticeship Training, Sion, Mumbai यांच्यामार्फत वितरीत करण्यांत येत होता. तथापि, सदरहू निधी वितरण प्रक्रियेमध्ये केंद्र शासनाने बदल केला असून कार्यक्रम राबविण्यांची व निधी वितरणाची जबाबदारी आता राज्य शासनावर सोपविण्यांत आलेली आहे. केंद्र शासनामार्फत सदर कार्यक्रमांतर्गत उपलब्ध होणा-या निधीचे VTP व AB ना वितरण केंद्र शासनाने ठरविलेल्या दरानुसार केंद्र शासनामार्फत केले जाईल. त्याअनुषंगाने DGET, New Delhi यांचे पत्र क्रमांक DGET-7/2/2010-MES/IS, दिनांक २९/१२/२०१० रोजीच्या पत्रानुसार कामगार व रोजगार मंत्रालय. नवी दिल्ली यांनी आर्थिक वर्ष २०१०-११ करीता मंजूर निधी रु.७,६५,५७,०००/- (रु.सात कोटी पासष्ट लाख सत्तावन्न हजार) एवढी रक्कम राज्य शासनाकडे वितरीत केली आहे. निधी वितरणाच्या पध्दतीमध्ये झालेल्या बदलाच्या अनुषंगाने राज्यातील कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत MES (मोडयुलर एम्प्लॉएबल स्किल) योजनेच्या निधी वितरणासाठी प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत MES (मोडयुलर एम्प्लॉएबल स्किल) योजनेच्या राज्यस्तरीय निधी वितरणासाठी सदर शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. सदरच्या निधी वितरणास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यांत येत आहे.

१. निधी वितरणासंबंधी संदर्भाधीन क्रमांक ३ / केंद्र शासनाकडून तसेच यापुढेही वेळोवेळी निर्गमित होणा-या सूचनांचे पालन करणे राज्य शासनावर बंधनकारक राहील.

२. केंद्र शासनाने वितरीत केलेला सदरचा निधी संबंधित Vocational Training Provider (VTP) आणि Assessing Body (AB) यांना प्रतिपूर्ती करण्यासाठी वापरणे बंधनकारक राहील.

३. केंद्र शासनाच्या कौशल्य विकास कार्यक्रम (Skill Development Initiative Scheme) ची माहिती पुस्तिका सप्टेंबर २०१० मध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार निधीचे वाटप केले जाईल.

४. MES अंतर्गत प्रशिक्षित उमेदवारांची संख्या नमुद करणा-या तपशिलासह संबंधित नोंदणीकृत VTP कडून विवरणपत्र सादर केल्यानंतरच प्रतिपूर्तीची रक्कम (रु.१५/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति तास) वितरीत करण्यांत येईल.

५. व्होकेशनल ट्रेनिंग प्रोव्हायडर (VTP) व ॲसेसिंग बॉडी (AB) यांना द्यावयाचे आर्थिक सहाय्य:-

i) प्रशिक्षण शुल्क:- कौशल्य विकास कार्यक्रम (Skill Development Initiative Scheme) माहिती पुस्तिका सप्टेंबर २०१० मध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार संबंधित VTP ना प्रतिपूर्ती करण्यांत येईल.

II) परिक्षा शुल्क:- कौशल्य विकास कार्यक्रम (Skill Development Initiative Scheme) माहिती पुस्तिका सप्टेंबर २०१० मध्ये नमुद केलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रमाणात संबंधित AB ना प्रतिपूर्ती करण्यांत येईल.

६. संचालक (प्रशिक्षण) यांच्यास्तरावर उपरोक्त प्रमाणे देण्यांत आलेल्या प्रशिक्षण शुल्क आणि परिक्षा शुल्क यांचा स्वतंत्र लेखा ठेवण्यांत यावा.

७. निधी वाटपाची पध्दती:- संचालक (प्रशिक्षण) यांनी प्रशिक्षणार्थी, VTP, AB यांना खालीलप्रमाणे निधी वाटपा संदर्भात पध्दत निश्चित करावी.

अ) प्रशिक्षण शुल्क (रु.१५/- प्रति प्रशिक्षणार्थी प्रति तास):- सदर रकमेची प्रशिक्षणाच्या पूर्ततेनंतर व संबंधित VTP कडून प्रशिक्षणा संदर्भातील देयके प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आंत VTP ना प्रतिपूर्ती करण्यांत यावी.

ब) परिक्षा शुल्क (रु.५००/- ते रु.८००/-):- परिक्षेच्या निकालानंतर संबंधित AB कडून परिक्षा संदर्भातील देयके प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आंत AB ना प्रतिपूर्ती करण्यांत यावी.

८. उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांना उपलब्ध होणा-या रोजगार / स्वंयरोजगारच्या संधींची VTP स्तरावर नोंद घेण्यांत यावी.

९. केंद्र शासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणा-या सूचना व DGET, New Delhi यांच्याकडून वेळावेळी दिल्या जाणा-या निर्देशांचे पालन करणे संचालक (प्रशिक्षण) / VTP / AB यांचेवर बंधकनकारक राहील.

१०. निधीच्या उपयोगितेनंतर विहित प्रपत्रामधील उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास वेळेत सादर करणे गरजेचे राहील.

११. प्रत्यक्ष खर्च झालेल्या रकमेची उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनास प्राप्त झाल्यानंतरच पुढील निधी वितरीत करण्यांत येईल.

१२. ज्या प्रयोजनासाठी निधी वितरीत करण्यांत येत आहेत त्याच प्रयोजनार्थ निधीचा वापर करावा.

१३. अखर्चित निधीचे समायोजन पुढील वर्षासाठी मंजूर तरतूदीमध्ये करण्यांत यावे.

हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०११०२२८२१३८४८००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(उ.वै.जोशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति

मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री. उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.सचिव, कामगार व सेवयोजन मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली.
मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहाय्यक.
संचालक (प्रशिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक/उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / नाशिक / औरंगाबाद / पुणे / अमरावती / नागपूर. [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत]
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
सर्व Vocational Training Provider (VTP), [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत]
सर्व Assessing Body (AB) [संचालक (प्रशिक्षण) यांचेमार्फत]
कार्यासन व्यशि-२, कार्यासन (साशि-१)
निवड नस्ती (व्यशि-५).